# पुणे महानगरपालिका

## जाहिरात प्रकटन

आरोग्य विभागांतर्गत खाली नमूद केल्याप्रमाणे ०७ पदांसाठी, एकूण ३८ पद्संख्येने, तांत्रिक खंड विरहीत सलग ०६ महिने कालावधीसाठी, करार पद्धतीने, एकवट मानधनावर अस्थायी सेवा घ्यावयाची असून, यासाठी शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारक उमेदवारांची मुलाखत (Walk-in-Interview) घेणेसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ क्र. | पदाचे नाव | एकूण पदांची संख्या | एकवट मासिक मानधन रुपये | शैक्षणिक अर्हता व अनुभव | गट |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्त्री रोग तज्ञ | ०८ | रक्कम रुपये १,७५,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष, पंच्याहत्तर हजार फक्त) | **शैक्षणिक अर्हता –** (१)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी. (स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र) **अनुभव –** किमान १० खाटांच्या शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयाकडील स्त्री रोग व प्रसूतीशास्त्र विषयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | अजा १ अज १ विजाअ १ इमाव १ एसईबीसी १ ईडब्ल्युएस १ अराखीव २ |
| | | | रक्कम रुपये १,२५,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष पंचवीस हजार फक्त) | **शैक्षणिक अर्हता –** (१)मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस., डी.जी.ओ. उत्तीर्ण **अनुभव –** (१)किमान १० खाटांच्या शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयाकडील स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र विषयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | |
| २ | बालरोग तज्ञ | ०९ | रक्कम रुपये १,७५,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष, पंच्याहत्तर फक्त) | **शैक्षणिक अर्हता –** मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी (बालरोग चिकित्सा शास्त्र) / डी.एन.बी. **अनुभव –** (१)किमान १० खाटांच्या शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयाकडील संबंधित विषयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक (२)नवजात अतिदक्षता विभागाकडील अनुभवास प्राधान्य | अजा १ अज १ विजाअ १ इमाव १ एसईबीसी १ ईडब्ल्युएस १ अराखीव ३ |
| | | | रक्कम रुपये १,२५,०००/- (अक्षरी-रक्कम रु एक लक्ष, | **शैक्षणिक अर्हता –** शासनमान्य विद्यापीठाची एम.बी.बी.एस., डी.सी.एच. उत्तीर्ण | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पंचवीस हजार फक्त) | **अनुभव –**<br>(१)किमान १० खाटांच्या शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयाकडील बालरोग चिकित्सा शास्त्र विषयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>(२)नवजात अतिदक्षता विभागाकडील अनुभवास प्राधान्य | |
| ३ | निओनेटोलॉजिस्ट (नवजात अर्भक तज्ञ) | ०२ | रक्कम रुपये १,७५,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष, पंच्याहत्तर हजार फक्त) | **शैक्षणिक अर्हता –**<br>(१)मान्यताप्राप्त विद्यापीठाची डी.एम. (निओनेटोलॉजी) पदवी<br>किंवा<br>(२)एम.डी. पिडियाट्रिक्स<br>किंवा<br>(3)एम.डी. पिडीयाट्रिक्स नंतरचा निओनेटोलॉजी विषयातील Indian Academy Of Pediatrics / Medical Council Of India प्रमाणित Fellowship<br>किंवा<br>(४)एम.डी. पिडीयाट्रिक्स नंतरचा निओनेटोलॉजी विषयातील डी.एन.बी. (निओनेटोलॉजी) किंवा समकक्ष पदवी<br>**अनुभव –**<br>(१)किमान १० खाटांच्या शासकीय/ निमशासकीय / खाजगी रुग्णालयाकडील निओनेटोलॉजी विषयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक. | अजा १<br>अराखीव १ |
| ४ | फिजिशियन | १० | रक्कम रुपये १,७५,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष, पंच्याहत्तर फक्त) | **शैक्षणिक अर्हता –**<br>(१)शासनमान्य विद्यापीठाची एम.डी. (मेडिसिन) पदवी<br>**अनुभव –**<br>(अ)किमान १० खाटांच्या शासकीय/निमशासकीय/खाजगी रुग्णालयाकडील अथवा स्वत:चा वैद्यकीय व्यवसाय असल्यास संबंधित विषयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक. | अजा १<br>अज १<br>विजाअ १<br>इमाव २<br>एसईबीसी १<br>ईडब्ल्युएस १<br>अराखीव ३ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | इन्टेसिव्हिस्ट | ०३ | रक्कम रुपये १,७५,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष, पंच्याहत्तर हजार फक्त) | **<u>शैक्षणिक अर्हता</u> –**<br>(अ)एम.डी. (मेडिसिन) व इमर्जन्सी मेडिकल किंवा तत्सम कोर्स प्रथम प्राधान्य<br>(ब)एम.डी. (मेडिसिन) द्वितीय प्राधान्य<br>(क)एम.डी. (अॅनेस्थेशिया) व इमर्जन्सी मेडिकल किंवा तत्सम कोर्स तृतीय प्राधान्य<br>(ड)एम.डी. (अॅनेस्थेशिया) चतुर्थ प्राधान्य<br>(इ)एम.डी. (चेस्ट) व इमर्जन्सी मेडिकल किंवा तत्सम कोर्स पंचम प्राधान्य<br>**किंवा**<br>एम.सी.आर. / महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ / डी.एम.ई.आर. या सम वरिष्ठ अभ्यासक्रम निर्देशित करणाऱ्या संस्थांच्या नियमावलीनुसार.<br>**<u>अनुभव</u>** - संबंधित विषयातील ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | अजा १<br>विजाअ १<br>अराखीव १ |
| | | | रक्कम रुपये १,२५,००० /- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष पंचवीस हजार फक्त) | **<u>शैक्षणिक अर्हता</u> –**<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस. , डी.ए. (अॅनेस्थेशिया विषयातील पदविका )<br>**<u>अनुभव-</u>** संबंधित विषयातील ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | |
| ६ | त्वचारोग तज्ञ | ०१ | रक्कम रुपये १,७५,००० /- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष पंच्याहत्तर फक्त) | **<u>शैक्षणिक अर्हता</u>** - मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.डी. (त्वचा व गुप्तरोग शास्त्र)<br>**<u>अनुभव</u>** - शासकीय/ निमशासकीय/ खाजगी रुग्णालयाकडील अथवा स्वत:चा वैद्यकीय व्यवसाय असल्यास संबंधित विषयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | अराखीव |
| | | | रक्कम रुपये १,२५,००० /- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष पंचवीस हजार फक्त) | **<u>शैक्षणिक अर्हता</u>** - एम.बी.बी.एस. व डी.व्ही.डी. पदविका (Diploma in venral Diseases)<br>**<u>अनुभव</u>** - (१)डी.व्ही.डी. पदविका (Diploma in venral Diseases) नंतरचा त्वचा व गुप्तरोग शास्त्र | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | विषयातील शासकीय / निमशासकीय/ खाजगी रुग्णालयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | |
| ७ | क्ष किरण तज्ञ रेडीऑलॉजिस्ट/सोनोलॉजीस्ट | ०५ | रक्कम रुपये १,७५,०००/- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष, पंच्याहत्तर हजार फक्त) | **शैक्षणिक अर्हता –** (१)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.डी. (क्ष-किरण शास्त्र) <br> **अनुभव** – क्ष - किरण शास्त्र विषयातील शासकीय / निमशासकीय/ खाजगी रुग्णालयाकडील अथवा स्वत:चा वैद्यकीय व्यवसाय असल्यास संबंधित विषयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक | अजा १ विजाअ १ इमाव १ एसईबीसी १ अराखीव १ |
| | | | रक्कम रुपये १,२५,००० /- (अक्षरी-रक्कम रुपये एक लक्ष पंचवीस हजार फक्त) | **शैक्षणिक अर्हता –** (१)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील एम.बी.बी.एस. डी.एम.आर.डी. (Diploma in Medical Radio Diagnosis) पदविका उत्तीर्ण <br> **अनुभव** - क्ष - किरण शास्त्र विषयातील शासकीय / निमशासकीय/ खाजगी रुग्णालयाकडील अथवा स्वत:चा वैद्यकीय व्यवसाय असल्यास संबंधित विषयातील कामाचा ०१ वर्षाचा अनुभव आवश्यक. | |

**अटी:-**

(१)वयोमर्यादा-खुला प्रवर्ग-शासन निर्णयानुसार उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.
मागासवर्गीय प्रवर्ग-शासन निर्णयानुसार उमेदवाराचे वय जाहिरातीचे दिनांकास ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

(२)शैक्षणिक पात्रता -जाहिरात प्रकटन तक्यात नमूद केल्याप्रमाणे पदनिहाय शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. (उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य देण्यात येईल.)

(३)अनुभव पात्रता- जाहिरात प्रकटन·तक्यात नमूद केल्याप्रमाणे पदनिहाय अनुभव पात्रता असणे आवश्यक आहे.

(४)सर्व ०७ अस्थायी पदांकरिता निवड प्रक्रियेसाठी प्राप्त अर्जांच्या संख्येनुसार छाननी करून शैक्षणिक अर्हता, अनुभव पात्रता आणि मुलाखत (Walk-in-Interview) याद्वारे एकूण १०० गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांकनानुसार गुणानुक्रम यादी तयार करण्यात येईल व निवड समितीमार्फत गुणवत्तेनुसार निवड करण्यात येतील. निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. तसेच निवड यादीतील गुणानुक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रम पदस्थापना दिली जाईल.

(५)मूळ विहित नमुन्यातील अर्जाबाबत आवश्यक माहिती खालीलप्रमाणे-

(अ)उमेदवाराने स्व हस्ताक्षरात अर्ज सादर करावा. संबधित अर्जामध्ये स्वतःचे नाव, जन्म दिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, ई मेल आयडी इत्यादी माहिती काळजीपूर्वक भरावी. तसेच उमेदवाराने स्वतःची जात, सामाजिक प्रवर्ग याबाबत स्पष्ट उल्लेख मूळ अर्जामध्ये करणे आवश्यक आहे.

(ब)उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्ज संपूर्ण भरावा. अपूर्ण भरलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील.

(क)अर्जामधील सर्व माहिती अचूक लिहावी. उमेदवाराने चुकीचे भरलेले अर्ज, चुकीची माहिती नोंदविलेले अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच अर्जामध्ये लिहिलेली माहिती व मूळ कागदपत्रामधील नोंदी यामध्ये तफावत आढळल्यास, संबंधित अर्ज अपात्र होतील.

(ड)उमेदवारांकडून वाचण्यायोग्य नसलेला अर्ज सादर केला असल्यास सदर अर्ज अपात्र समजण्यात येईल.

(इ)वरील मुद्दा क्रमांक (ब), (क) आणि (ड) यापैकी कोणत्याही कारणास्तव उमेदवाराचा अर्ज नाकारला गेल्यास अथवा अपात्र ठरल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

(६)पदनिहाय नमूद केलेली शैक्षणिक व अनुभव पात्रता धारण केलेल्या उमेदवारांनी, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह (जुना जी. बी. हॉल) पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत, आरोग्य कार्यालय, तिसरा मजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५ या ठिकाणी खाली नमूद केलेल्या निश्चित दिनांकास व वेळेत, विहित नमुन्यातील मूळ अर्ज व इतर आवश्यक कागदपत्रांच्या मूळ व साक्षांकित प्रतींसहित उपस्थित राहावे.

| अक्र | पदनाम | वार व दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | स्त्री रोग तज्ञ | गुरुवार दि. १७/९/२०२६ | सकाळी १०.०० ते सकाळी ११.०० |
| २ | बालरोग तज्ञ | गुरुवार दि. १७/९/२०२६ | सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० |
| ३ | निओनाटोलॉजिस्ट (नवजात अर्भक तज्ञ) | गुरुवार दि. १७/९/२०२६ | दुपारी १२.०० ते दुपारी ०१.०० |
| ४ | फिजिशियन | गुरुवार दि. १७/९/२०२६ | दुपारी ०१.०० ते दुपारी ०२.०० |
| ५ | इन्टेसिव्हिस्ट | गुरुवार दि. १७/९/२०२६ | दुपारी ०२.०० ते दुपारी ०२.३० |
| ६ | त्वचारोग तज्ञ | गुरुवार दि. १७/९/२०२६ | दुपारी ०३.०० ते दुपारी ०३.३० |
| ७ | रेडीऑलॉजिस्ट | गुरुवार दि. १७/९/२०२६ | दुपारी ०३.३० ते दुपारी ०४.०० |

(७)उमेदवारांनी वर नमूद निश्चित वेळेस, कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन, ऑफ लाईन पद्धतीने अर्ज सादर करावा. टपालाद्वारे पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. उमेदवाराच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी आणि नंतर मुलाखत (Walk-in-Interview) वर नमूद निश्चित वेळेतच घेतली जाणार आहे. यासाठी मुलाखतीसाठी येणाऱ्या उमेदवारांनी मूळ अर्जासोबत खाली नमूद आवश्यक कागदपत्रे (मूळ व स्वयं साक्षांकित प्रती) पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आरोग्य कार्यालयाकडे सादर करावयाच्या सर्व आवश्यक कागदपत्रांच्या स्वयं साक्षांकित प्रतींवर पानवारी (पेजिंग) करणे गरजेचे आहे. याशिवाय अर्जासोबत सादर केलेल्या एकूण कागदपत्रांची संख्या मूळ अर्जावर नमूद करावी.

(अ)जन्मतारखेच्या पुराव्यासाठी खालील आवश्यक कागदपत्र मूळ प्रत आणि मूळ कागदपत्रांची स्वयं साक्षांकित प्रत. (जन्मतारखेचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्मतारखेची नोंद असलेले शालांत परीक्षा उत्तीर्ण सर्टिफिकेट)

(ब)शैक्षणिक अर्हता गुणपत्रक (पदव्युत्तर पदवी / पदविकेच्या शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका) व शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र मूळ प्रती.आणि मूळ कागदपत्रांच्या स्वयं साक्षांकित प्रतीचा एक संच.

(क)महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची नोंदणी व नोंदणी नुतनीकरण आवश्यक.

(ङ)अनुभव पात्रतेसाठी शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आरोग्य संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र मूळ प्रती आणि मूळ कागदपत्रांच्या स्वयं साक्षांकित प्रतींचा एक संच.

(इ)महिला उमेदवारांनी त्यांच्या नावात काही बदल असल्यास (लग्नापूर्वीचे नाव, लग्नानंतरचे नाव) त्या संदर्भातील आवश्यक कागदपत्रे - शासनमान्य विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासनमान्य गॅजेटची (राजपत्र) मूळ प्रत व स्वयं साक्षांकित प्रत.

(ई)सध्याचा पासपोर्ट आकाराचा एक फोटो.

वर नमूद केल्याप्रमाणे मूळ अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या सर्व स्वयं साक्षांकित प्रती सादर न केल्यास संबंधित अर्ज अपात्र समजण्यात येतील. तसेच उमेदवाराने चुकीची प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे आढळल्यास किंवा निवड प्रक्रिया किंवा नियुक्त झाल्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती रोखून ठेवल्याचे आढळल्यास त्यांना अपात्र ठरवले जाईल व करार पद्धतीवरील अस्थायी नियुक्ती कोणतीही पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.

(८)(अ)कोणत्याही कारणांस्तव व परिस्थितीत निश्चित दिनांकास व वेळेत, अर्ज सादर करणे, मुळ कागदपत्रे पडताळणी, स्वयं साक्षांकित कागदपत्रे सादर करण्यासाठी व मुलाखतीसाठी उमेदवार उपस्थित राहिला नाही व निश्चित दिनांक आणि / किंवा वेळेनंतर उमेदवार सदर कार्यवाहीसाठी आरोग्य कार्यालयाकडे उपस्थित झाल्यास संबंधितांकडील मूळ अर्ज आणि / किंवा आवश्यक कागदपत्रे स्वीकारली जाणार नसून उमेदवाराची मुलाखत घेतली जाणार नाही.

(ब)उमेदवाराने निश्चित दिनांकास व वेळेत शैक्षणिक व अनुभवा संबंधित तसेच इतर आवश्यक कागदपत्र सादर केल्यावर तदनंतर दुसरी बदललेली कागदपत्रे आणि / किंवा कोणत्याही बाबीसंबंधित अतिरिक्त कागदपत्रे आरोग्य विभागामार्फत स्विकारण्यात येणार नाहीत.

(क)यासाठी उमेदवारांनी मुलाखतीचा दिनांक, वेळ आणि मूळ कागदपत्रे तसेच स्वयं साक्षांकित कागदपत्रांच्या प्रतींबाबत काटेकोर दक्षता घ्यावी.

(९)वरील तक्यात नमूद करण्यात आलेली सर्व ०७ पदे अस्थायी स्वरूपात ०६ महिने कालावधीसाठी, एकवट मानधन तत्वावर, करार पद्धतीने घेण्यात येणार आहेत. यामुळे भविष्यात संबंधित पदांवर (स्थायी) कायम स्वरूपाची नियुक्ती मागण्याचा हक्क असणार नाही.

(१०)अंतिम निवड यादीद्वारे निवड झालेल्या उमेदवारांना तांत्रिक खंड विरहीत, ०६ महिने कालावधीसाठी, संबंधित पदांवर अस्थायी नेमणूक दिली जाईल व यासाठी विहित नमुन्यात रक्कम रुपये ५००/- च्या स्टँप पेपरवर करारनामा करून द्यावा लागेल. तसेच संबंधित उमेदवारांस करारनामा स्वखचनि करून द्यावा लागेल.

(११)मूळ कागदपत्रे पडताळणी व मुलाखतीसाठी (Walk-in-Interview) येताना उमेदवारांना निश्चित स्थळी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

(१२)निवड आलेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्र मिळाल्यापासून पुढील ०७ दिवसांत कर्तव्यावर रुजू होणे बंधनकारक राहील. सबंधित ०७ दिवसांचे कालावधीत उमेदवाराने रुजू होण्यास असमर्थता दर्शविल्यास, प्रवर्गनिहाय प्रतीक्षा यादीतील अनुक्रमांकानुसार पुढील उमेदवारांस नियुक्ती पत्र देण्यात येईल.

(१३)सर्व ०७ पदांसाठी कामाचे स्वरूप ठरविण्याचे अधिकार मा.आरोग्य अधिकारी यांना राहतील.

(१४)वरील तक्यात नमूद केलेल्या सर्व ०७ पदांकरिता, दररोज ०८ तास (आरोग्य खात्याच्या आवश्यकतेनुसार व सोईनुसार रोटेशन प्रमाणे) सेवा देणे बंधनकारक राहील. तथापि याखेरीज कामकाजाची वेळ निश्चित करण्याचे अधिकार मा.आरोग्य अधिकारी यांचे असतील.

(१५)करार पद्धतीने भरती प्रक्रीयेअंतर्गत, निवड निकषांचे आधारे, कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही स्वरूपाचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

(१६)मूळ कागदपत्र पडताळणीसाठी व मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांस संबंधित पदांवर अस्थायी नियुक्ती देणेबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

(१७)रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. याशिवाय पदांची संख्या, मुलाखत आणि विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रे, प्रमाणपत्रे प्रती इत्यादी मुलाखतीचे वेळेस (Walk-in-Interview) सादर करणेबाबतची कार्यवाही (अ) स्थगित करणे, (ब) रद्द करणे, (क) अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका स्वत: कडे राखून ठेवतील, याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

(१८)संपूर्ण निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर खाली नमूद कारणास्तव उमेदवारी रद्दबातल केली जाईल.

(अ)अर्जदार विविध अर्हता धारण करणारा नसल्यास,

(ब)कोणत्याही स्वरुपाचे गैरवर्तन करताना आढळल्यास,

(क)खाजगी व राजकीय दबाव तंत्राचा वापर करताना आढळल्यास

तसेच अस्थायी नियुक्ती दिल्यावर वर नमूद बाबी निदर्शनास आल्यास, कोणतीही पूर्वसूचना न देता, संबंधित पदावरील अस्थायी नियुक्ती तातडीने संपुष्टात आणण्यात येईल.

(१९)संबंधित करार पद्धतीवरील भरती प्रक्रिया नजीकच्या भविष्यात पूर्ण झालेवर, अस्थायी नियुक्ती दिलेल्या व तदनंतर रुजू झालेल्या संबंधितांनी ऐच्छिक राजीनामा दिल्यामुळे, सदर संवर्गातील जागा रिक्त झालेस, नव्याने भरती प्रक्रिया न राबविता, संबंधित प्रवर्गासाठीच्या प्रतीक्षा यादीतील अनुक्रमांकानुसार पुढील उमेदवारास नियुक्ती आदेश दिले जातील.

(२०)संपूर्ण अस्थायी भरतीचे कार्यवाहीअंती तयार करण्यात आलेल्या अंतिम आणि प्रतीक्षा यादीस प्रशासकीय मान्यता मिळाल्यावर संबंधित दोन्ही याद्या त्या पुढील ०३ महिन्यांसाठी वैध राहतील.

(२१)निवड झालेल्या उमेदवारांस संबंधित पदावर अस्थायी सेवेत रुजू होण्यापूर्वी रक्कम रुपये ६७,७००/- (अक्षरी रक्कम रुपये सदुसष्ट हजार सातशे फक्त) इतकी रक्कम 'सेवा अनामत' म्हणून भरावी लागेल. सदर 'सेवा अनामत' ची संपूर्ण रक्कम अस्थायी सेवेचा निश्चित कार्यकाल संपुष्टात आल्यावर संबंधितांस बिनव्याजी परत करण्यात येईल.

(२२)संबंधित भरती अंतर्गत निश्चित केलेला करार कालावधी पूर्ण होण्याच्या आधी, कोणत्याही कारणास्तव, अस्थायी सेवा रद्द करावयाची असेल, तर सदर बाबत एक महिना अगोदर आरोग्य कार्यालयास लेखी स्वरुपात कळविणे बंधनकारक राहील. अशा प्रकारे अस्थायी सेवा रद्द करणेबाबत एक महिना अगोदर लेखी अवगत केले नाही, तर एक महिन्याच्या एकवट मानधनाची रक्कम जप्त करण्यात येईल.

(२३)पुणे महानगरपालिकेसाठी मध्यस्थ असल्याची बतावणी करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीमार्फत करार पद्धतीवरील नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध राहण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

(डॉ.निना बोराडे)
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

(पवनीत कौर)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)
पुणे महानगरपालिका